# जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**(गृह शाखा)**

homebranch.ahmednagar@gmail.com

दुरध्वनी क्र. 0241-2345449

**विषय - कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्याबाबत...**

**वाचावे** - 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005

2. साथ रोग अधिनियम, 1897
3. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144
4. सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दि.14/03/2020
5. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रं.डी एमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि. 02/05/2020
6. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन यांचेकडील आदेश क्रं. डी एमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि.17/05/2020
7. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन यांचेकडील आदेश क्रं. डी एमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि.19/05/2020
8. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन यांचेकडील आदेश क्रं. डी एमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि.31/05/2020
9. याकार्यालयाकडील आदेश क्र.डी.सी./कार्या9ब1/909/2020 दि.31/05/2020
10. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन यांचेकडील आदेश क्रं. डी एमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि.04/06/2020
11. याकार्यालयाकडील आदेश क्र.डी.सी./कार्या9ब1/913/2020 दि.04/06/2020
12. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन यांचेकडील आदेश क्रं. डी एमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि.25/06/2020
13. याकार्यालयाकडील आदेश क्र.डी.सी./कार्या9ब1/1033/2020 दि.26/06/2020
14. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन यांचेकडील आदेश क्रं. डी एमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि.29/06/2020
15. याकार्यालयाकडील आदेश क्र.डी.सी./कार्या9ब1/1046/2020 दि.30/06/2020
16. याकार्यालयाकडील आदेश क्र.डी.सी./कार्या9ब1/1051/2020 दि.03/07/2020
17. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन यांचेकडील आदेश क्रं. डी एमयु/2020/सीआर.92/डीआयएसएम-1 दि.06/07/2020
18. याकार्यालयाकडील आदेश क्र.डी.सी./कार्या9ब1/1090/2020 दि.07/07/2020

| क्र .डी.सी/कार्या 9ब1/ 1125/2020 | **आदेश** | अहमदनगर दि.16 /07/2020 |
|---|---|---|

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 दि.13 मार्च 2020 पासुन लागू करुन खंड 2, 3, 4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोरोना (कोव्हीड 19) वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्याकारणासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्र.14 अन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात मिशन बिगिन अगेन संदर्भात मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यास्तव अहमदनगर जिल्ह्यामध्ये कोरोना विषाणू (कोव्हीड 19) चा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकामी लॉकडाऊन संदर्भात सुधारीत मार्गदर्शक सुचनांसह प्रतिबंधात्मक आदेश संदर्भ क्र.15 अन्वये दि.31/07/2020 रोजीचे रात्री 24.00 वाजेपर्यंत लागू करणेत आलेला आहे.

ज्याअर्थी, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कोरोना बाधीत रुग्णांचे संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसुन आलेने संदर्भ क्र.16 दि.03/07/2020 रोजीचे आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी आदेश दि.17/07/2020 रोजी पर्यंत लागू करणेत आलेले आहेत. तसेच सद्यस्थितीत अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

त्याअर्थी, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे एक भाग म्हणुन नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमा होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणुन, मी जिल्हादंडाधिकारी अहमदनगर मला फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, **अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतुकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली याठिकाणी संचार, वाहतुक, फिरणे, उभे राहणे, थांबुन राहणे, रेंगाळणे असे कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे. सदरचा आदेश दि.18/07/2020 रोजी पासुन ते दि.31/07/2020 रोजी पर्यंत लागू राहील.**

अ) सायंकाळी 07.00 ते सकाळी 5.00 या कालावधीत

- **तातडीच्या वैद्यकिय कारणाव्यतिरिक्त व्यक्तींच्या हालचालीस परवानगी असणार नाही.**

तथापी Containment Zone वगळता खालील बाबतीत सदरचा आदेश लागु होणार नाही.

1. शासकिय, निमशासकिय कार्यालय, सरकारी महामंडळाचे उपक्रम/ आस्थापना यांचेकडील कर्तव्यावर असलेले अधिकारी व कर्मचारी.
2. रुग्णालय, दवाखाने, औषधे, फार्मा, पॅथॉलॉजी लॅबोरेटरी संबंधीत आस्थापना,
3. इलेक्ट्रीसीटी, पेट्रोलियम, ऑईल आणि उर्जा संबंधीत व्यक्ती/ आस्थापना.
4. दूरसंचार, इंटरनेट सेवा पुरविणा-या आस्थापना
5. प्रसारमाध्यमे प्रतिनिधी (Media) (जिल्हा माहिती अधिकारी यांचेकडील वैध ओळखपत्र असलेले प्रतिनिधी.)
6. अन्न धान्य, किराणा व इतर जिवनावश्यक वस्तूंचे होम डिलेवरी सेवा.
7. पिण्याचे पाणी पुरवठा व दुरुस्ती विषयक कामकाज संबंधीत.
8. मालवाहतुक करणारे ट्रक्स, टेम्पो.

**ब) सकाळी 05.00 ते सायंकाळी 7.00 या कालावधीत**

या कार्यालयाकडील आदेश क्र.डी.सी./कार्या9ब/1046/2020 दि.30/06/2020 अन्वये परवानगी असलेले व्यवहार / कृती / क्रिया (Activities) यांना परवानगी असेल.

तसेच या कार्यालयाकडील आदेश आदेश क्र.डी.सी./कार्या9ब1/1090/2020 दि.07/07/2020 अन्वये परवानगी असलेले व्यवहार/कृती/क्रिया (Activities) यांना परवानगी असेल.

अत्यावश्यक सेवा वगळता इतर कामांसाठी व्यक्तींना **Containment Zone वगळता** जवळच्या / लगतच्या परिसरामध्ये हालचालीस परवानगी राहील. **शहराच्या दूरच्या भागामध्ये हालचालीस परवानगी असणार नाही.**

कोणतीही व्यक्ती/ संस्था/ संघटना यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड विधान संहिता (45 ऑफ 1860) च्या कलम 188 नुसार दंडनिय / कायदेशिर कारवाईस व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

अहमदनगर महानगरपालिका यांनी सदर आदेशाची Public Address System व्दारे उदघोषणा करावी तसेच सदर आदेशास प्रसारमाध्यमांव्दारे प्रसिध्दी द्यावी.

जिल्हा दंडाधिकारी अहमदनगर

**स्वाक्षरित/-**
**(राहुल व्दिवेदी)**
**जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर**

प्रतः-मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रतः-जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडेस माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव
प्रतः-मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडेस माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव
प्रतः-आयुक्त, महानगरपालिका अहमदनगर यांचेकडेस माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव
प्रतः-जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडेस माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव
प्रतः-उपविभागीय दंडाधिकारी (सर्व) / तालुका दंडाधिकारी (सर्व) जि.अहमदनगर यांचेकडेस माहितीस्तव व उचित कार्याहीस्तव.
प्रतः-जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर

2/- सदर आदेशाची स्थानिक दैनिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी द्यावी.

प्रतः- सर्व विभाग प्रमख/ आस्थापना प्रमुख, अहमदनगर जिल्हा.

**(संदीप निचित)**
**अपर जिल्हादंडाधिकारी अहमदनगर**

Scanned by CamScanner